विशेष पोलीस वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय यवतमाळ

दिनांक : ०७/११/२०२२

## ओमनी कार मधुन बकऱ्या चोरन्यात सराईत असलेली "बकरीचोर टोळी " अखेर स्थानिक गुन्हे शाखेने केली जेरबंद

जिल्हयात दाखल असेलेले घरफोडी व चोरीचे गुन्हे उघडकीस आणुन अशा प्रकारचे गुन्हयांना प्रतिबंध करणे बाबत मा. पोलीस अधीक्षक डॉ. श्री. पवन बन्सोड यांनी पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळ यांना आदेशीत केले होते त्यावरुन पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळ यांनी स्था.गु.शा. कडील पथकांना दिलेल्या निर्देशावरुन स्थानिक गुन्हे शाखेकडील पथके चोरीसंबधाने दाखल गुन्हयांचा समांतर तपास करुन जास्तीत जास्त गुन्हे उघडकीस आणन्याचा प्रयत्न करीत असतांनाच दिनांक ०६/११/२०२२ रोजी स्थानिक गुन्हे शाखेतील पथकास बकऱ्या चोरी करुन विकणाऱ्या टोळी बाबत गोपणीय माहिती प्राप्त झाली.

त्यावरुन पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा यांनी अधिनस्त पथकांना सक्रीय करुन सदर टोळीबाबत माहिती काढुन आरोपीतांना ताब्यात घेण्याच्या सुचना दिल्या त्यावरुन **आरोपी नामे गणेश रमेश राठोड वय २१ वर्षे, रा. डेहणकर लेआऊट भोसा रोड यवतमाळ** यास ताब्यात घेवुन त्याचेकडे कौशल्यपुर्वक तपास करुन माहिती प्राप्त केली असता त्याने त्याचा **मुख्य साथीदार नामे काका उर्फ कुणाल पटले रा. यवतमाळ + ०४ वि.सं.बा.** सोबत मिळुन बकरी चोरीचे गुन्हे केले असल्याची कबुली दिली. वरुन ०४ वि.सं.बा. यांना विचारपुस करुन आरोपी गणेश रमेश राठोड व ०४ वि.सं.बा. यांचे कडुन गुन्हयात वापरलेल्या ०२ मोटार सायकल व चोरी केलेल्या बकऱ्या विक्रीतुन प्राप्त झालेले रोख रुपये **असा एकुण ९७,०००/- रुपयाचा मुद्देमाल हस्तगत** करुन पो.स्टे. लाडखेड व पो.स्टे. कळंब येथे बकरी चोरी संबधाने दाखल असलेले ०२ गुन्हे आतापावेतो उघडकीस आले आहेत. सदरचे आरोपीत हे एका चारचाकी मारोती ओमनी कारचा व मोटार सायकलचा वापर करुन जिल्हयातील वेगवेगळया टिकाणावरुन रात्रीचे आंधाराचा फायदा घेवुन चोरत असल्याचे व चोरी केलेल्या बकऱ्यांची विल्हेवाट गुन्हयातील मुख्य आरोपी काका उर्फ कुणाल पटले हा लावत असल्याची प्राथमीक माहिती उपरोक्त आरोपीकडुन प्राप्त झाली असुन काही दिवसांपुर्वी अशाच बकरीचोरीचे घटनेवेळी आरोपीत वापरत असलेल्या मोरोती ओमनी वाहनाचा अपघात झाला त्यामध्ये गुन्हयातील मुख्य आरोपी काका उर्फ कुणाल पटले रा. यवतमाळ हा गंभीर जखमी झाला असल्याने तो रुग्णालयात उपचार घेत असुन त्याचे प्रकृतीत सुधार होताच त्यास कायदेशीर ताब्यात घेवुन प्रकरणाचा अधिक तपास करण्यात येत असुन मुख्य आरोपीकडुन जिल्हयात बकरी चोरी संबधाने दाखल असलेले आणखी गुन्हे उघडकीस येण्याची दाट शक्यता आहे.

सदरची कारवाई ही मा. पोलीस अधीक्षक, यवतमाळ डॉ. श्री. पवन बन्सोड, अपर पोलीस अधीक्षक श्री. पियुश जगताप, यांचे मार्गदर्शनात श्री. प्रदीप परदेशी पो.नि. स्थागुशा, सपोनि अमोल मुडे, पोउपनि योगेश रंधे, पोउपनि सागर भारस्कर, शाम बोपचे, पोहवा बंडु डांगे, उल्हास कुरकुटे, योगेश डगवार, पो.ना. विनोद राठोड, निलेश राठोड, हरीष राऊत, धनंजय श्रीरामे, रजनिकांत मडावी, चापोना, सतीश फुके , चापोशी अमीत कुमरे स्थागुशा यवतमाळ यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

**(शुभांगी गुल्हाणे)**
जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधीक्षक, कार्यालय,यवतमाळ